22 DEC 2025

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

जनप्रवास

# ठरावातून विद्यार्थी हिताचा निर्णय

## शिवाजी विद्यापीठात बऱ्याच वर्षांनी पहिल्यांदाच ३३ ठराव मंजूर : ठरावाच्या अंमलबजावणीकडे सर्वांचे लक्ष

**जनप्रवास : अहिल्या परकाळे**

शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभेत अनेक वर्षांपासून दहाच्या आतच ठराव मंजूर केले जातात. नुकत्याच झालेल्या अधिसभेत १०५ पैकी तब्बल ३३ ठराव मंजूर करून सभागृहातील सदस्यांनी वेगळा संदेश दिला आहे. विद्यार्थी हिताचे ठराव मंजूर झाल्याने सर्वच अधिसभा सदस्यांचे शिक्षण क्षेत्रातून अभिनंदन होत आहे. परंतू या ठरावांच्या अंमलबजावणीकडे शिक्षण वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

शिवाजी विद्यापीठात दोन अध्यासन उभारणी, वैद्यकीय मदत निधी योजनेची रक्कम वाढवणे, शिवाजी विद्यापीठात बाह्य संघटनांचा हस्तक्षेप टाळणे, अभ्यास मंडळाच्या रिक्त जागा भरण्यास मान्यता देण्यात आली. तब्बल १२ तास पाच मिनिटे सुरू असलेल्या अधिसभेत अनेक सदस्यांनी आपले प्रश्न व ठराव मांडले. एखाद्या ठरावावर जवळपास अर्धा ते पाऊण तास चर्चा झाल्याने अधिसभा संपण्यास वेळ झाला.



काही ठराव व प्रश्नांवर अनावश्यक चर्चा झाली. त्यानंतर पुढे जाण्यास अधिसभा सदस्यांनी मान्यता दिली. परंतू सभागृहाने ३३ ठराव मंजूर केल्याने शिक्षण क्षेत्रातून सभासदांचे कौतुक केले जात आहे. विद्यापीठ अधिविभाग व २९८ महाविद्यालयांच्या शैक्षणिक प्रगतीचा आलेख उंचावण्यासाठी सर्वोच्च असलेले अधिसभा सभागृह काम करीत असते. विद्यार्थी, प्राध्यापक, कर्मचाऱ्यांच्या हितासाठी निर्णय घेण्यासाठी सर्वच अधिसभा सदस्यांनी एकमत केले पाहिजे, अशी शिक्षण वर्तुळात चर्चा आहे. अधिसभेत नेहमीच सुटा विरुद्ध सत्ताधारी असा संघर्ष पाहायला मिळायचा. परंतू शनिवारी झालेल्या अधिसभेत सुटाच्या अनेक प्रश्नांना सत्ताधाऱ्यांनी पाठिंबा दर्शवला. त्यामुळे सभागृहात खेळीमेळीच्या वातावरणात सभा पार पडली. तसेच तिन्ही स्थगन प्रस्ताव नाकारल्याने पहिल्यांदाच सभेच्या कामकाजावर बहिष्कार टाकता आला नाही. आपआपला प्रस्ताव मांडून झाला की परगावातील अधिसभा सदस्यांनी घर गाठले. तर ज्यांचे प्रस्ताव मागणे बाकी होते, असेच सदस्य रात्री तब्बल ११ वाजेपर्यंत सभागृहात उपस्थित होते.

शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभेत विद्यार्थ्यांचे प्रश्न, परीक्षा विभागातील परीक्षेच्या नियोजनासंदर्भावरच प्रश्नोत्तराचा तास संपला. प्रश्नोत्तराच्या तासात सुटातील दोन सदस्यांनी प्रश्न विचारले. त्यामुळे अधिसभेसाठी विद्यापीठ प्रशासनाकडे प्रश्न पाठवण्यास उशिर झालेल्यांना प्रश्नच विचारता आले नाहीत, याची खंत अनेकांनी व्यक्त केली. परंतू ठराव मांडून ते मंजूर करून घेण्यात अनेकांना यश आले.

अधिसभा सदस्यांचा आक्रमकपणा कमी करण्यासाठी अधिसभा अध्यक्षांनी खुबीने आपल्या कौशल्याचा वापर केला. अध्यक्षांच्या सूचनेनंतर अधिसभा सदस्यांचा त्रागा कमी झाल्याचे चित्र पाहायला मिळाले. तसेच अधिसभेत पहिल्यांदाच जास्त ठराव मंजूर झाले आहेत, हे खरे आहे. परंतू या ठरावांना अंतिम मंजुरी व्यवस्थापन परिषदेचे सदस्य देतील, त्यानंतरच ठरावांची अंमलबजावणी करण्यात येणार असल्याचे सांगितले.

### ठरावाची अंमलबजावणी कधी

सातवी अधिसभा असूनही पहिल्या अधिसभेतील ठरावाची अंमलबजावणी होताना दिसत नाही. मग आम्हाला काहीच किंमत नाही का?, अधिसभा सदस्यांनी मागणी करायची नाही का? विद्यापीठ प्रशासन ठरावाची अंमलबजावणी करण्यास वेळ का लावत आहे.

**– ॲड. अभिषेक मिठारी, सदस्य, अधिसभा, विद्यापीठ**

### सर्वच ठरावाची अंमलबजावणी करावी

अधिसभेत ३३ ठराव मंजूर झाले पण सर्वच ठरावांची अंमलबजावणी होणे अपेक्षित आहे. पुढील अधिकार मंडळांनी हे ठराव मंजूर करून पुढील कार्यवाही तातडीने करावी. विद्यार्थी हीत लक्षात घेऊन सर्वच ठरावाची तातडीने अंमलबजावणी करावी. तसेच मी महिलांबद्दल मांडलेला स्थगन प्रस्ताव का नामंजूर केला, हे स्पष्ट करावे.

**– श्वेता परुळेकर, सदस्य, अधिसभा, विद्यापीठ**

2 2 DEC 2025

पुण्यनगरी

# विद्यापीठात सहादिवसीय कार्यशाळेचा समारोप

**कोल्हापूर :** 'जॉब रेडीनेस अंडर इम्प्लोयबिलिटी स्किल्स फॉर स्टुडंट टीचर' या विषयावर आयोजित सहादिवसीय कार्यशाळेचा समारोप समारंभ झाला. शिवाजी विद्यापीठातील शिक्षणशास्त्र अधिविभाग व महिंद्रा प्राईड क्लासरूम नांदी फाऊंडेशन, हैदराबाद यांच्या वतीने आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून शिक्षणशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. चेतना सोनकांबळे म्हणाल्या, विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, तसेच सहकार्यवृत्ती आवश्यक आहे. संवाद कौशल्य, कार्यतत्परता अशी कौशल्ये गरजेची आहेत.

प्रास्ताविक डॉ. विद्यानंद खंडागळे यांनी केले. मुस्कान चावला यांनी प्रशिक्षक म्हणून काम केले. कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी सरस्वती कांबळे, संगीता माने, ममता घोटल, संजना भालकर यांनी कार्यभार पाहिला. सूत्रसंचालन सुहाना नायकवडी यांनी केले. यावेळी डॉ. रूपाली संकपाळ, सारिका पाटील, कादंबरी खांडेकर, डॉ. अंजली गायकवाड, श्रद्धा तांडेल, संगीता चंदनवाले, अतुल जाधव यांची उपस्थिती होती. नांदी फाऊंडेशनच्या ऐश्वर्या मरूथूवर, नेहा लाटे, शेफाली जनबंधू, स्वाती आयवळे यांना सन्मानित करण्यात आले.

22 DEC 2025

पुढारी

# शिवाजी विद्यापीठात 'ध्यानदिवस' साजरा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील आजीवन अध्ययन विस्तार विभागात रविवारी 'ध्यानदिवस' साजरा करण्यात आला. यात योगशिक्षक वर्ग व सोहम योगवर्गातील प्रत्यक्ष व ऑनलाईन पद्धतीने ७५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. विभाग प्रमुख प्रा. रामचंद्र पवार, वर्ग शिक्षिका वीणा मालडीकर व प्रीती चव्हाण यांनी मार्गदर्शन केले. ध्यान म्हणजे सतत बडबड करणाऱ्या अस्वस्थ मनाला शांत करणे. सध्याच्या या धावपळीच्या तसेच ताणतणावाच्या या जीवनशैलीमध्ये ध्यान खूप महत्त्वाचे आहे, त्याचा अभ्यास करणे काळाची गरज आहे. आपले चचल मन स्थिर करण्यासाठी हे अत्यावश्यक आहे. ध्यानाची सुरुवात श्वासापासून करणे ही अगदी सोपी पद्धत आहे. ध्यान मनातील अस्वस्थ कंपने शांत करते म्हणून आपण नैसर्गिक श्वासाबरोबर राहणे आवश्यक असून त्यातून आत्मशक्ती ऊर्जा व चांगले आरोग्य, मनःशक्ती आणि जीवनातील विवेक-ज्ञानाकडे नेते. आध्यात्मिक शक्ती, मानसिक व शारीरिक शक्ती वाढते, स्मरणशक्ती वाढते, मेंदू उत्तम प्रकारे व जास्तीत जास्त क्षमतेने कार्य करतो, असे यावेळी सांगण्यात आले.

22 DEC 2025
पुण्यनगरी

# विद्यापीठात मार्गदर्शक संवाद सत्र

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील नवोपक्रम, नवसंशोधन व उपक्रम मंडळ यांच्या वतीने नावीन्य व उद्योजकतेच्या क्षेत्रातील भागधारकांसाठी संवादात्मक सत्र शुक्रवारी पार पडले. या सत्रात भारत सरकारच्या राष्ट्रीय एमएसएमई बोर्डाचे सदस्य प्रदीप पेशकर प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू प्रा. ज्योती जाधव होत्या. या सत्रात एमएसएमई धोरणे व शासकीय साहाय्य योजना, स्टार्टअप्सच्या वाढी व विस्ताराच्या संधी, नवोपक्रम, बौद्धिक संपदा, तसेच उद्योजकता परिसंस्थेचा विकास या विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. स्वागत संचालक प्रा. सागर डेळेकर यांनी केले. यावेळी श्रीनिवास गायकवाड, काव्यश्री नलवडे, तसेच स्टार्टअप्स, उद्योजक, पेटंटधारक इनक्युबेटीज उपस्थित होते.

2 2 DEC 2025
सकाळ

# महावीर महाविद्यालयातर्फे कंदलगावात श्रमसंस्कार शिबिर

**सकाळ वृत्तसेवा**

कंदलगाव, ता. २१ : महावीर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) विभागाच्या वतीने आयोजित विशेष श्रमसंस्कार शिबिराचे उद्घाटन झाले. उद्घाटनप्रसंगी शिवाजी विद्यापीठ, प्र-कुलगुरू प्रा. डॉ. ज्योती जाधव प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. अध्यक्षस्थानी महावीर महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. अद्वैत जोशी होते.

राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. अंकुश बनसोडे यांनी प्रास्ताविक केले. पाहुण्यांची ओळख शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभा सदस्या श्वेता परुळेकर यांनी करून दिली. उद्घाटन कार्यक्रमास सचिन बराटे, प्रा. रविदास पाडवी, प्रा. जयवंत दळवी, डॉ. महादेव शिंदे, डॉ. शशिकांत अन्नदाते, प्रा.अंकित पोरवाल, सुषमा चौगुले, प्रियांका जाधव आदी प्राध्यापकांसह सरपंच राहुल वसंत पाटील, सरदार माने, योजना दुर्गुळे, राजू पांढरपळे, संग्राम पाटील, पांडुरंग घोलप यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य व राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक उपस्थित होते. तन्वी नलवडे व राजलक्ष्मी शिंदे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. प्रदीप गायकवाड यांनी आभार मानले.

22 DEC 2025

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

महा न्यूज & व्ह्यूज

वामाक्षी
BOUTIQUE
Hanuman Nagar, ITI-Pachgaon road,
Front of Nimit Corner Appartment, Kolhapur.
Mob.- 9175089609

# शिवाजी विद्यापीठात एमएसएमई व स्टार्टअप्ससाठी मार्गदर्शक संवाद सत्र



**कोल्हापूर (महा न्यूज अँण्ड व्ह्यूज) :**

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथील नवोपक्रम, नवसंशोधन व उपक्रम मंडळ, शिवाजी विद्यापीठ यांच्या वतीने नाविन्य व उद्योजकतेच्या क्षेत्रातील भागधारकांसाठी संवादात्मक सत्राचे आयोजन शुक्रवार, दि. १९ डिसेंबर २०२५ रोजी करण्यात आले. या सत्रात भारत सरकारच्या राष्ट्रीय एमएसएमई बोर्डाचे सदस्य मा. श्री. प्रदीपजी पेशकर प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. या सत्रात एमएसएमई धोरणे व शासकीय सहाय्य योजना, स्टार्टअप्सच्या वाढी व विस्ताराच्या संधी, नवोपक्रम, बौद्धिक संपदा (IP) तसेच उद्योजकता परिसंस्थेचा विकास या विषयांवर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

श्री. पेशकर यांनी केंद्र सरकारच्या विविध योजनांची माहिती देत उद्योजकांनी त्या योजनांचा प्रभावी लाभ कसा घ्यावा, याबाबत मार्गदर्शन केले. तसेच उपस्थितांनी विचारलेल्या प्रश्नांना त्यांनी समर्पक उत्तरे देत थेट संवाद साधला.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्र-कुलगुरू प्रा. ज्योती जाधव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांनी भूषविले. सदर संवाद सत्र सर्वांसाठी अत्यंत मार्गदर्शक असे संबोधित केले. उपस्थितांचे स्वागत, संचालक प्रा. सागर डेळेकर यांनी केले. यावेळी श्री. श्रीनिवास गायकवाड, सौ. काव्यश्री नलवडे तसेच स्टार्टअप्स, उद्योजक, पेटंटधारक इनक्युबेटीज मोठ्या संख्येने उपस्थित होते.

22 DEC 2025

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

महा न्यूज अँण्ड व्ह्यूज

वामाक्षी BOUTIQUE
Hanuman Nagar, ITI-Pachgaon road,
Front of Nirmal Corner Appartment, Kolhapur.
Mob.- 9175089609

# सहा दिवसीय कार्यशाळेचा समारोप समारंभ



**कोल्हापूर (महा न्यूज अँण्ड व्ह्यूज) :**

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर ,शिक्षणशास्त्र अधिविभाग व महिंद्रा प्राइड क्लासरूम नांदी फाउंडेशन, हैदराबाद यांच्या वतीने ''जॉब रेडीनेस अंडर इमप्लोयबिलीटी स्किलस फॉर स्टुडंट टीचर ''या विषयावर सहा दिवसीय कार्यशाळेचा समारोप समारंभ झाला.

यासाठी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिक्षणशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ.चेतना प्र.सोनकांबळे या होत्या यावेळी त्यांनी ''विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, इतरांना प्रेरणा देणे ,सहकार्य वृत्ती व आवश्यक संवाद कौशल्य,कार्यतत्परता असायला हवी'' असे प्रतिपादन केले.

प्रस्तुत कार्यशाळेचे प्रास्ताविक समन्वयक डॉ.विद्यानंद खंडागळे यांनी व नांदी फाउंडेशनच्या मुस्कान चावला यांनी प्रशिक्षक म्हणून कार्य केले. प्रस्तुत कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी सरस्वती कांबळे, संगीता माने, ममता घोटल, संजना भालकर यांनी कार्यभार पाहिला.सूत्रसंचालन बी.एड,एम.एड (एकात्मिक) प्रशिक्षणार्थी सुहाना नायकवडी यांनी केले. यावेळी डॉ. रुपाली संकपाळ, सारिका पाटील, श्रीमती कादंबरी खांडेकर, डॉ. अंजली गायकवाड, श्रध्दा तांडेल ,संगीता चंदनवाले अतुल जाधव यांची उपस्थिती होती. नांदी फाउंडेशन कडून सहभाग घेऊन उत्कृष्ट कृती करणाऱ्या एश्वर्या मरूथूवर,नेहा लाटे,शेफाली जनबंधू,स्वाती आयवळे यांना सन्मानित करण्यात आले. त्याचप्रमाणे विद्यापीठ परिक्षेत्रातील विद्यार्थ्यांनी कार्यशाळेमध्ये सहभाग नोंदविला.